सन २०१७-१८ करिता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता ₹५५४.३३ लाख निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: राकृवि ०८१७/प्र.क्र. ९५/राकृवियो कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०१ मार्च, २०१८

वाचा :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. ०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. १३.०४.२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.०४.२०१७
३. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१७-आरकेव्हीवाय, दि. १५.०५.२०१७
४. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची समितीच्या २३ व्या बैठकीचे इतिवृत्त क्र. RKV-०३१७/C.R.१४/RKVY Cell, दि. ०९/०६/२०१७
५. कृषि व सहकारीता विभाग, केंद्रिय कृषि मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१७ आरकेव्हीवाय/३, दि. १६.०६.२०१७
६. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि.०३.०७.२०१७
७. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. राकृवि ०८१७/प्र.क्र. ९५/राकृवियो कक्ष, दि.०३.१०.२०१७
८. कृषि व पदुम विभागाचा शासन शुद्धीपत्रक क्रमांक: राकृवि ०८१७/प्र.क्र .९५/राकृवियो कक्ष, दि.२४.१०.२०१७
९. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची समितीच्या २४ व्या बैठकीचे इतिवृत्त क्र. RKV-०३१७/C.R.११/१४-A, दि. ०२/०१/२०१८
१०.आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. बीयुडी-२०१७/प्र.क्र. ११/कार्यासन.६, दि.१६.०२.२०१८

प्रस्तावना :

राष्ट्रीय कृषि विकास योजना (राकृवियो) केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० प्रमाणाच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजनेस सन २०१७-१८ करिता केंद्र शासनाने दि. १५/०५/२०१७ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र हिस्यासाठी ₹३९.३७ कोटी व राज्य हिस्यासाठी ₹२६.२४ कोटी असे एकूण ₹६५.६१ कोटी नियतवाटप (Allocation) मंजूर केले. सदर नियत वाटपाच्या अनुषंगाने संदर्भांकित दि. ०३ जुलै, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

संदर्भाधिन दि.१६ जुन, २०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राज्यास केंद्र हिस्याचा पहिल्या हप्त्यात ५० % म्हणजे ₹ १९.६७ कोटी निधी वितरीत केला आहे.

तत्कालिन स्थितीत योजनेंतर्गत केवळ केंद्र हिस्याची तरतुद उपलब्ध असल्याने सदर केंद्र हिस्याचा ₹ १९.६७ कोटी निधी संदर्भाधिन दि.०३ ऑक्टोंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला होता. सद्यस्थितीत आदिवासी विकास विभागाने संदर्भाधिन दि.१६ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य हिस्याच्या तरतुदी स्वरुपात ₹५५४.३३ लाख निधी कृषि विभागास उपलब्ध करुन दिला आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत दि.२५ मे, २०१७ रोजी मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या (SLSC) २३ व्या बैठकीत उन्नत शेती -समृद्ध शेतकरी मोहिमेंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्पास रु.१०० कोटी व दि.१५.१२.२०१७ रोजी झालेल्या २४ व्या SLSC च्या बैठकीत रु.२०० कोटी अतिरिक्त प्रकल्प किंमत मंजूर केली आहे. अशाप्रकारे, एकूण ₹३०० कोटी प्रकल्प किंमतीपैकी सद्यस्थितीत प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता ₹१८०.०८ कोटी निधी वितरित केलेला आहे तथापी, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गाचा मिळून सुमारे ₹१९.९२ कोटी निधीचे वितरण अद्याप बाकी आहे. सदर कृषि यांत्रिकीकरण प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता एकूण रु. २८.९२ कोटी देय ठरतो (केंद्र हिस्सा ₹ १७.३५ कोटी व राज्य हिस्सा ₹ ११.५७ कोटी).

संदर्भाधिन दि.३०.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राकृवियोंतर्गत केंद्र हिस्याचा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता केंद्र हिस्याचा ₹९६४ लाख निधी वितरीत करण्यात आला होता. त्यानुषंगाने, सद्यस्थितीत अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या राज्य हिस्यापोटी देय तरतुदीच्या अनुषंगाने ₹५५४.३३ लाख निधी राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत "उन्नत शेती-समृद्ध शेतकरी मोहिमेंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्पास" वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः

१. सन २०१७-१८ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी या शासन निर्णयान्वये आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे राज्य हिस्स्याचा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता एकूण ₹ ५५४.३३ लाख निधी (रुपये पाच कोटी चोपन्न लाख तेहत्तीस हजार फक्त) पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(रक्कम ₹ लाख)

अ.क्र.	**योजनेचे नाव**	**अनुसूचित जमाती प्रवर्ग**
		राज्य हिस्सा (४०%)
१.	राष्ट्रीय कृषि विकास योजना- सर्वसाधारण राकृवियो	५५४.३३
एकूण		**५५४.३३**

२. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती करिता केवळ राज्य हिस्याचा निधी वितरीत करण्यात येत आहे. सद्यस्थितीत वितरीत केलेला राज्य हिस्याचा

₹५५४.३३ लाख निधी (रुपये पाच कोटी चोपन्न लाख तेहत्तीस हजार फक्त) पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०१७-१८ करिता अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा -

प्रवर्ग	राज्य हिस्सा
अनुसूचित जमाती	**मागणी क्रमांक टी -५** २४०१- पीक संवर्धन ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना ०१- जनजाती उपयोजनेंतर्गत योजना (०१) (२९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ A७५३) ३३-अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹५५४.३३ लाख रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध झालेली ₹५५४.३३ लाख रक्कम कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) मध्ये जमा करावी व तसे शासनास अवगत करावे आणि तद्नंतर सदर निधी आयुक्त (कृषि) यांना प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी वर्ग करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता उन्नत शेती -समृध्द शेतकरी मोहिम अंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्पास संदर्भाधिन दि.३०.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्र हिस्याचा ₹९६४ लाख निधी वितरीत करण्यात आला असून, राज्य हिस्सा करिता सद्यस्थितीत उपलब्ध झालेला ₹५५४.३३ लाख निधी या शासन निर्णयान्वये "उन्नत शेती-समृद्ध शेतकरी मोहिमेंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्पास" वितरीत करण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशिल या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केला आहे व त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे :-

(रक्कम ₹ लाख)

अ.क्र.	वितरीत निधीचा अंमलबजावणी यंत्रणानिहाय तपशील	वितरीत निधी
१	आयुक्त (कृषि)	५५४.३३

६. या शासन निर्णयान्वये केवळ 'अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता' निधी वितरीत करण्यात आला असून आयुक्त (कृषि) यांनी त्यांना मंजूर केलेल्या प्रकल्पांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी आवश्यक असलेल्या निधीकरिता उपरोक्त रकमेचा विनियोग करावा.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार तसेच आदिवासी विभागाच्या संदर्भांकित शासन निर्णय दि. १६.०२.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या निधी वितरणाच्या अनुषंगाने व त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०३१५३३४४७९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहपत्र : परिशिष्ठ -अ

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1be e0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cff d3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.03 15:22:23 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
२. मा.मंत्री (कृषि व फलोत्पादन), मंत्रालय, मुंबई
३. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई
४. मा. राज्यमंत्री (कृषि), मंत्रालय, मुंबई
५. सर्व मा. संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य/महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१३.संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१४.महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१५.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१६.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१७.सहायक संचालक (लेखा-१), कृषिआयुक्तालय, पुणे
१८. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
१९.निवड नस्ती.

परिशिष्ट - अ							
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग शासन निर्णय क्र. राकृवि-०३१७/प्र.क्र.२३/राकृवियो कक्ष, दि. ०१/०३/२०१८ चे सहपत्र							
राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रकल्प निहाय/अंमलबजावणी यंत्रणा निहाय ₹५.५४३३ कोटी निधीचे अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता वितरण							
वर्ष- २०१७-१८						(रक्कम ₹ कोटी)	
अ.क्र.	प्रकल्पाचे नाव	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	नवीन प्रकल्पांची किंमत / जुन्या प्रकल्पांची उर्वरीत किंमत	मागील वर्षापर्यंत वितरीत निधी	चालू वर्षी वितरित निधी	सन २०१७-१८ करिता उर्वरित प्रकल्प किंमत	अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी मंजूर केंद्र हिस्स्याचे निधी वितरण
१	२	३	४	५	६	७ (४-६)	८
१	उन्नत शेती - समृद्ध शेतकरी मोहिम अंतर्गत यांत्रिकीकरण प्रकल्प	२०१७-१८	३००.००	०.००	१८०.०८	११९.९२	५.५४३३
	आयुक्त (कृषि)						